**पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद पालघर**

कक्ष क्र.०१४, नवीन जिल्हा परिषद प्रशासकीय इमारत पालघर - बोईसर रोड, नवनगर , पालघर (प) ४०१ ४०४
ई-मेल:- dahopalghar@gmail.com दूरध्वनी क्र.०२५२५-२०५४१०

---

# स्वारस्य अभिव्यक्ती (EOI-EXPRESSION OF INTEREST)

भटक्या व मोकाट कुत्र्यांचे निर्बिजीकरण व रेबीज रोगाचे लसीकरण करण्याकरिता जिल्हा परिषद पालघर हद्दीमध्ये स्वतःच्या अथवा भाड्याच्या जागेवर कुत्र्यांसाठी निवारा उभारून सदर ठिकाणी भटक्या व मोकाट कुत्र्यांची नसबंदी शस्त्रक्रिया करण्याचे नियोजन असून भारतीय जीव जंतू कल्याण मंडळ यांच्या मान्यता प्राप्त संस्थाकडून सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी नमूद केलेल्या अटी व शर्तीस अधीन राहून नसबंदी शस्त्रक्रियासाठी स्वारस्य अभिव्यक्ती प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.

स्वाक्षरी/-
जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी
जिल्हा परिषद पालघर

# अनुक्रमणिका


| अ.क्र | विषय | पान क्र. |
| --- | --- | --- |
| अ | **स्वारस्य अभिव्यक्ती (EOI-EXPRESSION OF INTEREST) चे आमंत्रण** | १ |
| १ | थोडक्यात परिचय | ३ |
| २ | स्वारस्य अभिव्यक्तीचे उद्दिष्ट | ३ |
| ३ | कामाची  व्याप्ती | ४ |
| ४ | कार्यक्रमांचे वेळापत्रक | ४ |
| ५ | निवड पद्धत | ५ |
| ६ | पूर्व-पात्रता निकष | ६ |
| ब | सहभागींना सूचना | |
| १ | स्वारस्य अभिव्यक्ती (EOI )सादर करणे | ६ |
| २ | स्वारस्य अभिव्यक्ती (EOI )सोबत असणारी कागदपत्रे | ७ |
| ३ | स्वारस्य अभिव्यक्ती (EOI)मध्ये सुधारणा | ७ |
| ४ | अर्जांसाठी प्राथमिक परीक्षा | ७ |
| ५ | अर्जाचे मूल्यमापन | ७ |
| ६ | स्वारस्य अभिव्यक्ती (EOI)नाकारणे | ७ |
| ७ | मूल्यमापन निकष | ७ |
| ८ | गुणपत्रिका | ७ |
| ९ | तपशीलवार तांत्रिक मूल्यमापन पत्रिका | ७ |
| १० | अस्वीकरण(disclaimer) | ७ |
| ११ | नियम आणि अटी | ८-९ |
| क | प्रपत्रांचे नमुने | |
| १ | प्रपत्र 1 प्रस्तावाचा नमुना प्रपत्र | १० |
| २ | प्रपत्र 2 पूर्व-पात्रता निकष | ११ |
| ३ | प्रपत्र 3 श्वान निर्बीजीकरण प्रकल्प अनुभवाचा तपशील<br>पूर्ण झालेल्या / हाती घेतलेल्या प्रकल्पांबद्दल माहिती | १२ |
| ४ | प्रपत्र 4 सहभागींबद्दल तपशील | १३ |
| ५ | प्रपत्र 5 प्रतिज्ञापत्र किंवा स्व-घोषणा | १४ |

## अ.१) थोडक्यात परिचय

पालघर जिल्ह्यातील वाढत्या भटक्या व मोकाट कुत्र्यांच्या संख्यामुळे बऱ्याच वेळेस माणसे व प्राणी यांना श्वानदंशाचे प्रमाण वाढत आहे. सदर वाढत्या मोकाट कुत्र्यांच्या संख्येस आळा घालण्याकरिता त्यांचे निर्बीजीकरण शस्त्रक्रिया करणे गरजेचे आहे. तसेच मोकाट कुत्र्यांपासून रेबीज रोगाचा प्रसार देखील फैलावतो , त्या कारणामुळे त्यांचे रेबीज लसीकरण करणे निकडीचे आहे. त्या अनुषंगाने मोकाट कुत्र्यांचे निर्बिजीकरण व रेबीज रोगाचे लसीकरण प्राणी जन्म नियंत्रण नियम २०२२ नुसार करण्याकरिता जिल्हा परिषद पालघर हद्दीमध्ये स्वतः च्या अथवा भाड्याच्या जागेवर कुत्र्याचा निवारा उभारून सदर ठिकाणी भटक्या व मोकाट कुत्र्यांची नसबंदी शस्त्रक्रिया करण्याचे नियोजन असून भारतीय जीव जंतू कल्याण मंडळ यांच्या मान्यता प्राप्त संस्थाकडून २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी कुत्र्यांची नसबंदी शस्त्रक्रियासाठी व रेबीज लसीकरण करिता स्वारस्य अभिव्यक्ती प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.

## अ.२) स्वारस्य अभिव्यक्तीचे उद्दिष्ट

एक्स्प्रेशन ऑफ इंटरेस्ट (EOI) च्या या आमंत्रणाचा उद्देश आहे.

1. पालघर जिल्ह्यातील वाढत्या भटक्या कुत्र्यांच्या /श्वान संख्येवर नियंत्रण ठेवणे.
2. प्राणी जन्म नियंत्रण आणि प्राणी या क्षेत्रातील चांगल्या संस्थांची निवड करणे.
3. श्वानांमध्ये रेबीज लसीकरण करून रेबीज रोगाचा प्रसार थांबवणे.

सदर स्वारस्य अभिव्यक्ती दस्तऐवज मध्ये कामाचे स्वरूप ,कामाची व्याप्ती, पात्रता आवश्यकता, प्रपत्रे आणि इच्छुक सहभागींसाठी प्रस्ताव सादर करण्याची प्रक्रिया नमूद करण्यात येत आहे . निकषांची पूर्तता करणारे अर्ज केवळ मूल्यांकन केले जातील आणि निवड केलेले संस्थांना नियुक्त केले जाईल .जिल्हा परिषद पालघर कोणत्याही टप्प्यावर कोणत्याही किंवा सर्व प्रस्ताव स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार राखून ठेवतो, प्रक्रियेचे कोणतेही कारण न देता आणि त्यावर कोणताही दावा / प्रतिदावे स्वीकार केले जाणार नाही.

**अ.३) कामाची व्याप्ती**

1. भारतीय जीव जंतू कल्याण मंडळ (AWBI) यांच्या मान्यते नुसार भटके व मोकाट कुत्र्यांच्या नसबंदी ( Spaying & Castration) शस्त्रक्रिया करणे, लसीकरण करणे यासाठी रु.१४५०/- प्रतिश्वान हा दर निश्चित केला आहे व भटक्या व मोकाट कुत्रे नसबंदीसाठी पकडणे व शस्त्रक्रियेनंतर पुन्हा त्याच जागेवर सोडणे यासाठी रु २००/- प्रती श्वान असा एकूण १६५०/- रुपये खर्च निश्चित केलेला आहे.
2. सदर दर निविदा कालावधी पर्यंत सारखाच राहील .
3. जिल्हा परिषद पालघर हद्दीतील भटक्या व मोकाट कुत्र्यांची नसबंदी शस्त्रक्रिया करणेसाठी भारतीय जीव जंतू कल्याण मंडळ (AWBI) ने वेळोवेळी निर्देशित केलेल्या नियमावलीचे पालन करणे बंधनकारक आहे. नियमावलीचे पालन न झाल्यास कायदेशीर प्रश्न उद्भवल्यास त्यास कंत्राटदार स्वतः जबाबदार राहील .
4. नसबंदी ऑपरेशन्सच्या पडताळणीसाठी कुत्र्यांची नसबंदी ऑपरेशन्स नंतर पशुसंवर्धन विभागाचे पशुवैद्यकीय अधिकारी व सनियंत्रण समिती द्वारे शस्त्रक्रियेच्या संख्येच्या अवयवांची (वृषण किंवा गर्भाशयाची) तपासणी करून AWBI च्या सुधारित( प्राणी जन्म नियंत्रण नियम २०२२ , १० मार्च २०२३ नुसार) सत्यापित केले जाईल.
5. भटक्या व मोकाट कुत्र्यांची नसबंदी शस्त्रक्रिया, औषधोपचार खर्च, अँटीरेबीज लसीकरण करणे,शस्त्रक्रिया पश्चात होणारा खर्च (post-oprative cost ) आणि त्यांच्या खाण्याचा खर्च तसेच निर्धारित केलेले सेवकवर्गाच्या वेतनावर होणारा संपूर्ण खर्च, वाहन खर्च, इंधन खर्च ,इमारतीचे भाडे, इत्यादि खर्च करण्याची जबबाबदारी नियुक्त होणाऱ्या संस्थेची राहील. या करिता जिल्हा परिषद पालघर जबाबदार राहणार नाही.
6. वेळोवेळी जारी केलेले इतर कोणतेही निर्देश अथवा सूचना ह्या नियुक्त संस्था यांना बांधील राहतील.

**अ.४ ) कार्यक्रमांचे वेळापत्रक**

| | |
|---|---|
| स्वारस्य अभिव्यक्ती चे प्रकाशन | दिनांक १२/९/२०२३, सकाळी ११.०० वाजे पासून ते<br>दिनांक १८ /९/२०२३. दुपारी ३.०० वाजे पर्यंत |
| स्वारस्य अभिव्यक्ती चे कागदपत्र छाननी | २०/९/२०२३ |
| पूर्व पात्रता निकष पूर्ण करणाऱ्या स्वारस्य अभिव्यक्तीतील पात्र संस्थेचे सादरीकरण | स्वतंत्रपणे कळविण्यात येईल. |
| स्वारस्य अभिव्यक्तीतील पात्र संस्थेची निवड व घोषणा | स्वतंत्रपणे कळविण्यात येईल. |

**अ.५) निवड पद्धत**

स्वारस्य अभिव्यक्ती द्वारे मागवण्यात आलेले प्रस्ताव यांची छाननी समिती विहित नमुन्यात मागीवलेले कागदपत्रे यांचे मूल्यमापन करून निवड यादी घोषित करण्यात येईल . तरी पूर्व पात्रता निकष असणे गरजेचे आहे. सदर निवड समितीचा निर्णय अंतिम राहील .

**अ.६) पूर्व पात्रता  निकष**

1) स्वयंसेवी संस्था, (4 महिन्यांच्या आत) भारतीय जीव जंतु कल्याण मंडळ (AWBI) कडे श्वान निर्बीजीकरण करण्यास पात्र असावी , अथवा तसे हमी पत्र कार्यारंभ आदेशानंतर 4 महिण्याच्या मुदतीत सादर करावे .

2) एनजीओची नोंदणी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त कायदा 1950 / बॉम्बे पब्लिक ट्रस्ट कायदा 1950, अंतर्गत नोंद असावी .

3) सहभागींना कुत्रे नसबंदीच्या क्षेत्रात भरीव अनुभव असेल.

4) ग्रामपंचायत निहाय कामाच्या ठिकाणाच्या उपलब्धतेला प्राधान्य दिले जाईल.

5) खाते आणि शिल्लक विवरणासह मागील 3 वर्षांचे प्राप्तिकर विवरण अनिवार्य असेल.

6) सहभागीं संस्था यांना नसबंदीच्या ऑपरेशनच्या  संख्येच्या आधारे प्राधान्य दिले जाईल.

7) सहभागी संस्था या  कायदेशीर व्यक्ती/संस्था कंपनी/ फर्म  म्हणून नोंदणीकृत असेल.

८) सहभागी भारतात/मूळ देशात काळ्या यादीत टाकलेले नसावे,(हमी).

९) पालघर जिल्ह्यातील कार्यक्षेत्रात श्वान निर्बीजीकरण प्रकल्प राबावल्याचा अनुभव .

१०) प्रत्येक दाव्याचे समर्थन अधिकृत कागदपत्रांद्वार करणे अनिवार्य आहे.

**अ.७) मूल्यमापन निकष**

अर्जदार संस्था ज्यांनी पूर्व पात्रता निकष पूर्ण केले आहेत त्यांचे मुल्यमापन , तांत्रिक  मूल्यमापन समिती द्वारे करण्यात येईल . मूल्यमापन १०० गुण प्रतवारी वर करण्यात येईल. सदर गुणांचे तपशील  खाली गठीत समिती द्वारे करण्यात येईल.

**१)अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी.**
**२)मुख्य लेखा व वित्त अधिकारी .**
**३)जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी .**
**४)पशुधन विकास अधिकारी** .

**अ.८) गुणपत्रिका**

| **मूल्यमापन निकष** | **कमाल गुण संख्या** | **मिळालेले गुण** |
|---|---|---|
| श्वान निर्बीजीकरण मध्ये अनुभव (वर्षांमध्ये) | 20 | |
| गेल्या 10 वर्षांत केलेल्या श्वान निर्बीजीकरण ऑपरेशन्सची एकूण संख्या | 20 | |
| हातात घेतेलेल  / पूर्ण झालेल्या  श्वान निर्बिजीकरण प्रकल्पांची संख्या | 20 | |
| प्राणी जन्म नियंत्रण कार्यक्रमासह इतर प्रकल्प हाती घेणे | 10 | |
| सादरीकरण | 20 | |
| पालघर जिल्ह्यात काम केल्याचा अनुभव | 10 | |
| एकूण | 100 | |

* निवड होण्यासाठी, सहभागीला किमान 50 गुण मिळणे आवश्यक आहे(अट शिथिल करण्याचे सर्व अधिकार निवड समिती कडे बाधित राहतील ).

**अ.९) तपशीलवार  तांत्रिक मूल्यमापन पत्रिका**

| अनुक्रमांक | मूल्यमापन निकष | एकूण गुण १०० | | |
|---|---|---|---|---|
| | | श्रेणी | कमाल गुण | प्राप्तगुण |
| 1 | श्वान निर्बीजीकरण मध्ये अनुभव (वर्षांमध्ये) | प्रत्येक वर्षास  २ गुण | २० | |
| 2 | गेल्या 10 वर्षांत केलेल्या श्वान निर्बीजीकरण ऑपरेशन्सची एकूण संख्या | प्रती २००० हजार शस्त्रक्रियाठी १ गुण | २० | |
| 3 | हातात घेतेलेले अथवा सुरू असलेल्या  श्वान निर्बिजीकरण प्रकल्पांची संख्या | महानगर पालिका अंतर्गत प्रकल्पास २ गुण , नगर पालिका अंतर्गत प्रकल्पास १ गुण | २० | |
| 4 | प्राणी जन्म नियंत्रण कार्यक्रमासह इतर प्रकल्प हाती घेणे | रेबीज लसीकरण कार्यक्रम | ५ | |
| | | मोबाईल अम्बुलांस (बाहयउपचार ) | ५ | |
| 5 | सादरीकरण -वाहतूक व्यवस्था, शस्त्रक्रिया सामुग्री ,शस्त्रक्रिया गृह ,  श्वान आश्रय व्यवस्था,कार्यकुशल कामगार .इत्यादी | सादरीकरणाच्या आधारे मुल्यांकन करण्यात येईल | २० | |
| 6 | पालघर जिल्ह्यात काम केल्याचा अनुभव | प्रती वर्ष २  गुण | १० | |
| | | एकूण गुण | १०० | |

* 'प्रकल्प'हा महानगर पालिका(वर्ग x,y,z),नगरपालिका ,जिल्हा परिषद अंतर्गत एक कंत्राट ह्यास एक प्रकल्प समजण्यात येईल.

**ब)सहभाग घेणाऱ्या संस्थाना  सूचना**

ब.१ ) **स्वाक्षरीदार अधिकृत (AUTHORIZED SIGNATURE)**

EOI स्वायत अभिरुची चे अर्ज सादर करताना सादरकर्ता हा त्या संस्थेचा अधिकृत स्वाक्षरीदार असावा तसेच सर्व दस्तावेज व प्रमाणपत्रे हे अधिकृत स्वाक्षरीदार यानेच प्रमाणित करून पाठवाव्यात. संपूर्ण पत्र व्यवहार हा संस्थे कडून होताना हा अधिकृत स्वाक्षरीदार मार्फत च स्वीकारला जाईल.

ब.२) **स्वारस्य अभिरुची सादर करणे (SUBMISSION OF EOI)**

सदर स्वारस्य अभिरुची जिल्हा परिषद पालघर यांच्या संकेत स्थळ www.zppalghar.gov.in व तसेच https://mahatenders.gov.in  वर सदर दस्तावेज उपलब्ध असेल .तरी सर्व नमूद केलेले कागदपत्रे ,प्रपत्र , दस्तावेज,प्रमाणपत्र, https://mahatenders.gov.in  वर अपलोड करण्यात यावेत.

**ब.३) स्वारस्य अभिव्यक्ती (EOI)सोबत लागणारी कागदपत्रे**

स्वायत अभिरुची (EOI) दाखल करणाऱ्या संस्थांनी खालील प्रमाणे कागदपत्रे जोडावीत

१) अधिकृतता पत्र(Letter of Authorization)
२) प्रपत्र 1 प्रस्तावाचा नमुना प्रपत्र
३) प्रपत्र 2 पूर्व-पात्रता निकष(Pre-Qualification Criteria)
४) प्रपत्र 3 श्वान निर्बीजीकरण प्रकल्प अनुभवाचा तपशील
५) प्रपत्र 4 सहभागींबद्दल तपशील
६) प्रपत्र 5 प्रतिज्ञापत्र किंवा स्व-घोषणा
७) मूल्यमापन निकषांनुसार अतिरिक्त समर्थन करणारे दस्तऐवजअथवा कागदपत्रे .
८) मागिल तीन वर्षाचे प्राप्तीकर विवरण(ITR Returns) , ताळेबंद विवरण(Account And Balance Sheet)
९) इतर कोणतीही माहिती अर्जदाराला त्यांचे दावे सिद्ध करण्यासाठी सादर करावयाचे असल्यास सोबत जोडावेत.

स्वायत अभिरुची चे सर्व दस्तावेज हे पशुसंवर्धन विभाग जिल्हा परिषद पालघर येथे टपालाने , स्वहस्ते तसेच ई निविदा संकेत स्थळावर सादर करावेत .

**ब.४) स्वारस्य अभिव्यक्ती (EOI)मध्येसुधारणा**

स्वारस्य अभिव्यक्ती मध्ये स्वताहून अथवा संस्थे मार्फत काही तृटी निदर्शनास आल्यास सदर स्वारस्य अभिव्यक्ती मध्ये सुधारणा करण्याचे संपूर्ण अधिकार हे जिल्हा परिषद पालघर राखून ठेवीत आहे . तसेच अर्ज सादरकरण्याची शेवटची तारीख बदलण्याची संपूर्ण अधिकार हे अभाधित राहतील.

**ब.५) अर्जांसाठी प्राथमिक परीक्षा**

१) जिल्हा परिषद पालघर आलेल्या सर्व अर्जांची छाननी करेल.
२) सदर अर्जांमध्ये काही त्रुटी असतील पण त्या सदर कार्यक्रम राबिविन्या करिता अति महत्वाच्या बाबी नसल्यास त्या त्रुटी दुर्लक्षित करण्याचे संपूर्ण अधिकार निवड समितीस राहतील.
३) अर्जादारंचे मुल्यांकन हे उपलब्ध माहिती नुसार केला जाईल . तरी जर अधिक स्पष्टीकरण लागणार असेल तर तसे मागविण्याचे संपूर्ण अधिकार निवड समिती कडे अभाधित राहतील.

**ब.६) अर्जांचे मूल्यमापन**

अर्जांच्या मूल्यांकनाची प्रक्रिया खाली दर्शविली आहे

१) स्वायत अभिरुची ( EOI)मध्ये पूर्व-पात्रता निकष निर्दिष्ट केले आहेत त्या प्रमाणे अर्जदाराने प्रस्तावित कागदपत्रे त्याच क्रमाने सादर करावेत.
२) केवळ सहभागी, जे पूर्व पात्रता निकष पूर्ण करतात, त्यांचे नमूद केलेल्या मूल्यमापन निकषांनुसार निवडीसाठी मूल्यांकन केले जाईल.
३) मुल्यमापनात किमान 50 गुण मिळवणाऱ्या सहभागींना शॉर्ट लिस्टिंगसाठी विचारात घेतले जाईल. तसेच सदर अट शिथिल करण्याचे सर्व अधिकार निवड समिती अबाधित राहतील .

**ब.७) स्वारस्य अभिव्यक्ती (EOI)नाकारणे.**

अर्ज नाकारला जाण्यास खालील कारणाने केले जाईल :
अ) अर्ज  विहित नमुन्यात नाही आणि त्यात सर्व आवश्यक तपशील नाहीत.
ब) देय तारीख आणि वेळ संपल्यानंतर प्राप्त होणारे अर्ज .
क) स्वायत अभिव्यक्ती ( EOI)सोबत योग्य सहाय्यक कागदपत्रे नाहीत.

**ब.८) अस्वीकरण(disclaimer)**

जिल्हा परिषद कोणत्याही अर्जाच्या उशीरा प्राप्तीसाठी जबाबदार राहणार नाही. उशिरा प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही**.**

**ब.९) प्रस्तावितअटी व शर्ती पुढील प्रमाणे-**

1. अनिमल वेल्फेअर बोर्ड ऑफ इंडियाच्या मान्यतेनुसार भटके व मोकाट कुत्र्यांच्या नसबंदी शस्त्रक्रिया करणे, लसीकरण करणे यासाठी र.रु.१४५० /- प्रति श्वान हा दर निश्चित केलाआहे व भटक्या व मोकाट कुत्रे नसबंदीसाठी पकडणे व शस्त्रक्रिये नंतर पुन्हा त्याच जागेवर सोडणे यासाठी रु. २००/- प्रतीश्वान असा एकूण १६५०/- रुपये खर्च निश्चित केलेला आहे.
2. सदर दर निविदा कालावधी पर्यंत सारखाच राहील .
3. जिल्हा परिषद पालघर हद्दीतील भटक्या व मोकाट कुत्र्यांची नसबंदी शस्त्रक्रियाकरणेसाठी ॲनिमल वेल्फेअर बोर्ड ऑफ इंडियाने वेळोवेळी निर्देशित केलेल्या नियमावलीचे पालन करणे बंधनकारक आहे. नियमावलीचे पालन न झाल्यास कायदेशीर प्रश्न उद्भवल्यास  मक्तेदार सर्वस्वी जबादार राहील .
4. अनिमल वेलफेयर बोर्ड ऑफ इंडियाच्या दि.३/६/२०२१ च्या मार्गदर्शक सूचनानुसार सदर प्रकल्पा मध्ये भाग घेणाऱ्या संस्थांना किंवा यापूर्वी कामकरत असलेल्या संस्थांना ABC & AR साठी AWBI ची स्वतंत्र परवानगी घेणे आवश्यक आहे. ABC & AR साठी ॲनिमल वेल्फेअर बोर्ड ऑफ इंडियाची स्वतंत्र परवानगीचे प्रमाणपत्र ३० दिवसात जिल्हा परिषद पालघरकडे सादर करणे आवश्यकआहे. प्रमाणपत्र ३० दिवसात सादर न केल्यास सदर संस्थाना अपात्र करण्यात येईल.
5. Animal Birth Control (Dog) चे काम करणाऱ्या सर्व संस्थांनी सनियंत्र समिती च्या देखरेखी खाली काम करणे बंधनकारक राहील.
6. भटक्या व मोकाट कुत्र्यांची नसबंदी शस्त्रक्रिया, औषधोपचार खर्च, अँटी रेबीज लसीकरण करणे तसेच निर्धारित केलेले खर्च, सेवक वर्गाच्या वेतनावर होणारा संपूर्ण खर्च, वाहन खर्च, इंधन खर्च करण्याची जबबाबदारी नियुक्त होणाऱ्या संस्थेची राहील. याकरिता जिल्हा परिषद पालघर जबाबदार राहणार नाही.
7. खाजगी अशासकीय संस्थाकडून कुत्र्यांचे पकडताना व सोडताना चे  Geo Tag फोटो हे बंधनकारकआहे.
8. सदर पात्र ठरणाऱ्या संस्थाचे खाजगी पायाभूत सुविधा (इन्फ्रास्ट्रक्चर )  जिल्हा परिषद पालघर हद्दीत अथवा हद्दी जवळ असावे. तसेच पशुसंवर्धन विभागाने ठरवून दिलेल्याच ग्रामपंचायती व प्रभाग ,पाडे, वस्ती येथे नसबंदी शस्त्रक्रिया करण्याकरिता कुत्री पकडावी लागतील.
9. पात्र ठरणाऱ्या संस्थेना जिल्हा परिषद पालघरच्या आवश्यकते नुसार व नियोजना प्रमाणे नसबंदी शस्त्रक्रिया करण्याचे काम वाटून देण्यात येईल.
10. संस्थेच्या कामावर पशुसंवर्धन विभागाचे नियंत्रण राहील.
11. सदर प्रकल्पा मध्ये पात्र ठरणाऱ्या सर्व संस्थाना जागतिक Zoonoses Day (६जुलै) व जागतिक रेबीज डे (२८ सप्टेंबर ) या दिवशी मोकाट व भटक्या श्वानांना मोफत लसीकरण करणे बंधनकारक राहील त्यासाठी जिल्हा परिषद पालघर कोणतेही रक्कम अदा करणार नाही.
12. सदर संस्था यांना कुठेलेही वीज देयक , पाणी देयक देय राहणार नाही.सदर खर्च नियुक्त संस्थेने करावयाचे आहे .
13. यशस्वी सहभागीला जिल्हा परिषद पालघर यांना नुकसान भरपाई बॉण्ड (Indemnity bond) सादर करावा लागेल.

14. सहभागी संस्था सुरक्षा ठेव उद्योग ,ऊर्जा व कामगार विभाग शा.नि. दि 1/12/2016 मधील मार्गदर्शक सूचना नुसार सुरक्षा ठेव ही देयका मधून कपात करण्यात येईल.
15. बयाना (EMD) ठेव रुपये ८५०००/- रु चा धनाकर्ष "Chief Accounts and Finance Officer, Palghar " यांचे नावे जमा करावे लागेल.
16. सदर नियुक्त संस्थानी नियोजित लक्षांका प्रमाणे काम न केल्यास सदर करार रद्द करण्याचे संपूर्ण अधिकार जिल्हा परिषद राखून ठेवते व त्या विरोधात कोर्टात जाण्याचा अथवा याचिका करता येणार नाही.
17. वरील अटी व शर्तीचा भंग झाल्यास सदर संस्थेला देण्यात आलेले काम अथवा करण्यात आलेला करारनामा रद्द करण्याचे अथवा काम काढून घेण्याचे अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर यांना राहतील.
18. सदर कंत्राट हे पालघर जिल्ह्यातील वेगवेगळ्या ग्रामपंचायत अंतर्गत निश्चित केलेल्या दरानुसार व वेळोवेळी दिलेल्या सुचने नुसार अनुपालन करण्यात यावे.
19. सदर योजनेचा प्रागतिक अहवाल दर ६० दिवसांनी सादर करावा .प्रागतिक अहवाल हा स्थानिक अवयव मोजनी समोर पारित करूनच सादर करण्यात यावा .
20. सदर निविदेची निविदा शुल्क रुपये ५१०० /- ,व ९१८/- रु GST एकूण ६०१८/- रु असेल .
21. निविदा उद्योग ,ऊर्जा व कामगार विभागा कडिल शासन निर्णय दिनांक १/१२/२०१६ मधील मार्गदर्शक सूचना नुसार अंतिम करण्यात येईल.
22. प्रस्तुत प्रकरणी प्राप्त झालेले प्रस्ताव स्विकारण्याचा अथवा रद्द करण्याचे अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर यांनी राखून ठेवले आहेत.

स्वाक्षरी/-
**जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी**
**जिल्हा परिषद पालघर**

स्वाक्षरी/-
**अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद पालघर**

**प्रपत्र 1**

## स्वारस्य अभिरुचीच्या प्रस्तावाचा नमुना

प्रति,
मा. मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद ,पालघर

विषय : जिल्हा परिषद पालघर अंतर्गत भटक्या व मोकाट कुत्र्यांचे निर्बिजीकरण व रेबीज रोगाचे लसीकरण करण्याकरिता स्वायत अभिव्यक्ती सादर करणे बाबत .

महोदय,

उपरोक्त विषयानुसार , खाली स्वाक्षरी केलेल्यांनी स्वारस्य अभिव्यक्ती (EOI)संबंधित सर्व दस्तऐवजांचे तपशीलवार वाचन आणि परीक्षण केले आहे तसेच तुमच्या कार्यक्षेत्रात निर्दिष्ट कार्यक्रमासाठी काम करण्यासाठी याद्वारे स्वारस्य व्यक्त करत आहोत.

| अनुक्रमांक | वर्णन | शेरा |
|---|---|---|
| १ | सहभागी संस्थेचे नाव | |
| २ | पत्ता | |
| ३ | व्यक्तीचे नाव, पद आणि पत्ता<br>( Authorized Signature) | |
| ४ | दूरध्वनी क्रमांक | |
| ५ | मोबाइल क्रमांक(संपर्क व्यक्ती ) | |
| ६ | ई - मेल आयडी संस्थेचा | |
| ७ | ई - मेल आयडी(संपर्क प्रमुख) | |

मी /आम्ही खालील प्रमाने कागदपत्रे सोबत जोडले आहेत .

१. अधिकृतता पत्र.( Letter of Authorisation)
२. संस्थेच्या लेटर हेडवर योग्य रित्या सीलबंद आणि अधिकृत व्यक्तीने स्वाक्षरी केलेला अर्ज (प्रपत्र १ )
३. पूर्व-पात्रता पात्रता निकष (प्रपत्र २).
४. श्वान निर्बिजीकरण अनुभव (प्रपत्र ३)
५. अर्जदाराबद्दल तपशील( प्रपत्र ४ )
६. प्रतिज्ञापत्र/ स्व-घोषणा(प्रपत्र ५ )
७. आवश्यक कागदपत्रांच्या स्व-प्रमाणित प्रती (Attested Copy Of Supporting Documents).
८. मागील तीन वर्षाचे प्राप्तीकर विवरण (ITR returns) , ताळेबंद विवरण (Account And Balance sheet).

मी/आम्ही याद्वारे घोषित करतो की माझा/आमचा स्वायत अभिव्यक्ती (EOI) सद्भावनेने केला आहे आणि त्यात असलेली माहिती हि खरी आहे .

आपला विश्वासू
सही
पद
शिक्का
दिनांक _________स्थळ-______________

**प्रपत्र २**

**पूर्व-पात्रता निकष**

| अनु क्रमांक | विवरण | शेरा |
|---|---|---|
| १ | संस्थेचे AWBI Registration नोंदणी स्थिती / मान्यता - आहे /नाही | |
| २ | संस्थेत कार्यरत नोंदनीकृत पशुवैद्यक (MSVC/VCI ) नावे व नोंदणी क्रमांक | |
| ३ | धर्मादाय आयुक्त यांच्याकडील नोंदणी | |
| ४ | श्वान निर्बिजीकरन करण्याचा अनुभव वर्षांमध्ये | |
| ५ | श्वान निर्बीजीकरण करण्यात येणाऱ्या जागेची तपशीलवार माहिती. | |
| ६ | संस्थेची श्वान निर्बीजीकरण करण्याची मासिक क्षमता | |
| ७ | संस्था कुठल्याही राज्यात काळ्या यादीत नसल्याबाबत हमीपत्र | |
| ८ | संस्था पालघर जिल्ह्यात कार्यरत असल्यास तपशीलवार माहिती . | |

अर्जदाराची स्वाक्षरी

**प्रपत्र ३**

श्वान निर्बीजीकरण (प्राण्यांच्या जन्म नियंत्रणातील) अनुभवाचे तपशील

श्वान निर्बीजीकरण (प्राणी जन्म नियंत्रण उपक्रमातील) अनुभवाचे तपशील आणि पूर्ण झालेल्या / हातात असलेल्या प्रकल्पांची माहिती.

| अनुक्रमांक | उपक्रम राबिविणाऱ्या स्वायत संस्थेचे नाव (Name Of Hiring Authority ) | स्वायत संस्थेचा पत्ता व संपर्क तपशील | कामाचे स्वरूप | निर्बिजीकरन करण्यात आलेल्या श्वानांची संख्या | उपक्रम चालू केल्याची दिनांक | उपक्रम समाप्त केल्याची दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |
| ३ | | | | | | |
| ४ | | | | | | |
| ५ | | | | | | |

अर्जदाराची स्वाक्षरी

टीप:-

कृपया लक्षात घ्या कामावर घेणाऱ्या प्राधिकरणाकडून कार्यारंभ आदेश (वर्क ऑर्डर) सादर करणे आवश्यक आहे.

**प्रपत्र ४**

सहभागी स्वयं सेवी संस्था बद्दल तपशील

| | |
|---|---|
| स्वयंसेवी संस्थेचे नाव | |
| कामाचा अनुभव | |
| कार्यालयाचा पत्ता | |
| इतर अनुषंगिक माहिती | |
| इतर आवश्यक दस्तावेज<br>१)धर्मादाय आयुक्तां कडे नोंदणी<br>२)AWBI ची मान्यता<br>३)MSVC/VCI नोंदणी प्रमाणपत्रे | |

अर्जदाराची स्वाक्षरी

**प्रपत्र ५**

**शपथपत्र किंवा स्व-घोषणा**

**संदर्भ: स्वारस्य अभिव्यक्ती -श्वान निर्बीजीकरण व रेबीज लसीकरण स्वयं सेवा भावी संस्था (एनजीओ) मार्फत करणे बाबत .**

निवड प्रक्रियेत सहभागी होण्यापासून वगळण्यात येईल जर ,

१) संस्था किंवा संस्था चालक दिवाळखोरी झाली असल्यास,अथवा न्यायालीन प्रकरणात कर्ज देणाऱ्या सोबत सामंजस्य /अथवा सेटलमेंट झाली असल्यास .
२) त्यांच्या व्यावसायिक वर्तनाशी संबंधित गुन्ह्यासाठी दोषी ठरविण्यात आले आहे, असे कुठलेही न्यायिक प्रकरण .
३) कोणत्याही मार्गाने सिद्ध झालेल्या गंभीर व्यावसायिक गैरवर्तनासाठी दोषी आहेत, जे करार प्राधिकरण न्याय ठरवू शकते.
४) भ्रष्टाचार, आणि गुन्हेगारी संघटना किंवा इतर कोणत्याही बेकायदेशीर घटकापासून सहभाग समुदायांच्या आर्थिकहित संबंध असल्यास .
५) ह्या आधी इतर प्राधिकरणा सोबत करार केल्या नंतर करार पूर्ण न करताच करार मोडला असल्यास.
६) कुठलाही राजकीय दबाव आणल्यास .

तुमच्या स्वारस्याच्या अभिव्यक्तीच्या आव्हानाला प्रतिसाद म्हणून, मी/आम्ही याद्वारे घोषित करतो की:

१) मी/आम्ही मला/आम्हाला वरील पैकी कुठलीही परीस्थिती लागू होत नाही.
२) मी/आम्ही व्यवसायातील सर्वोच्च नैतिक मानकांचे पालन करण्यास सहमत आहोत आणि विशेषतः हितसंबंधांचा कोणताही संभाव्य संघर्ष नाही (CONFLICT OF INTEREST);
३) स्वायत अभिव्यक्ती (EOI) प्रक्रियेदरम्यान किंवा अंमलबजावणी दरम्यान कोणत्याही टप्प्यावर वरीलमध्ये काही बदल आढळल्यास मी/आम्ही प्राधिकरणाला ताबडतोब कळवेन .
४) मी/आम्ही पूर्णपणे ओळखतो आणि स्वीकारतो कि, कोणतीही चुकीची किंवा अपूर्ण माहिती जाणून बुजून दिलेली असल्यास स्वायत अभिव्यक्ती (EOI)अर्ज नाकारण्यात येऊ शकतो.

`

(अर्जदाराची किंवा संस्थेच्या अधिकृत प्रतिनिधीची स्वाक्षरी स्टॅम्प/सीलसह)

Signature Not Verified

Digitally signed by DHANRAJ WAGHAMBAR PANDE
Date: 2023.09.11 19:04:13 IST
Location: Maharashtra-MH